• सार्वजनिक आयव्यय म्हणजे ‘अशा विषयांपैकी एक जो अर्थशास्त्र आणि राज्यशास्त्र यांच्या सीमारेषेवर असतो, तो सार्वजनिक अधिसत्तेचा महसूल आणि खर्च व त्यातील समायोजन यांच्याशी संबंधित असतो.' ही सार्वजनिक आयव्ययची व्याख्या कोणाची ?

डाल्टन

स्टिग्लर

टेलर

यापैकी एकही नाही

• सार्वजनिक आयव्ययात ..........

उत्पन्नानुसार खर्चात मेळ घातला जातो.

खर्चानुसार उत्पन्नात मेळ घातला जातो.

उत्पन्न आणि खर्च यांचा विचार केला जात नाही.

उत्पन्न आणि खर्च यांचा विचार केला जातो.

• सार्वजनिक आयव्ययाशी खालीलपैकी कोणते धोरण संबंधित आहे?

मौद्रिक धोरण

राजकोषीय धोरण

परवाना धोरण

औद्योगिक धोरण

• खालीलपैकी कोणते विधान बरोबर आहे ते स्पष्ट करा.

भांडवलशाही अर्थव्यवस्थेत सार्वजनिक आयव्यय मुळीच महत्त्वाचे नसतात.

समाजवादी अर्थव्यवस्थेत सार्वजनिक आयव्ययांना फारसे महत्त्व दिले जात नाही.

अलीकडे भांडवलशाही अर्थरचनेतही सार्वजनिक आयव्ययांना बरेच महत्त्व दिले जाते.

यापैकी नाही

• कार्यात्मक आयव्यय ही संकल्पना .... शी संबंधित आहे.

सनातनवाद्यांशी

हॅन्सन

केन्स

सोलो

• सनातनवाद्यांनी नेहमीच ..... वर भर दिल्याचे आढळून येते.

असंतुलित अंदाजपत्रक

तुटीचे अंदाजपत्रक

संतुलित अंदाजपत्रक

भांडवली अंदाजपत्रक

• कार्यात्मक आयव्यय ही संकल्पना केव्हा रूढ झाली ?

पहिल्या महायुद्धानंतर

महामंदीनंतर

दुसऱ्या महायुद्धानंतर

अनिश्चित

• राजकीय उपाययोजना ज्या मार्गाने अर्थव्यवस्थेत कार्य करू शकतात त्यांचे निदान करण्याचे कार्यात्मक आयव्यय, अशी कार्यात्मक आयव्ययाची व्याख्या कोणी केली ?

ए. पी. लर्नर

डाल्टन

स्टिग्लर

रिकार्डो

• सार्वजनिक आयव्ययाच्या महत्त्वाच्या बाजू कोणत्या ?

सार्वजनिक महसूल (उत्पन्न)

सार्वजनिक खर्च

पैशाचा पुरवठा

सार्वजनिक महसूल (उत्पन्न) आणि सार्वजनिक खर्च

• खालीलपैकी कोणते विधान बरोबर आहे ते स्पष्ट करा.

अलीकडच्या काळात शासनाचे कार्य आणि आयव्यय ॲडम स्मिथने केलेल्या शासनाच्या कार्यासंबंधीच्या विवेचनानुसार चालते.

अलीकडच्या काळात निर्हस्तक्षेप नीतीमुळे शासनाचे कार्य आणि आयव्यय नगण्य असल्याचे दिसून येते.

अलीकडच्या काळात शासनाचे कार्य आणि आयव्यय कार्यात्मक आयव्ययाच्या उद्दिष्टानुसार चालते.

वरीलपैकी एकही नाही.

• कार्यात्मक आयव्यय ही संकल्पना कोणी मांडली ?

स्टिग्लर

डाल्टन

ए. पी. लर्नर

टेलर

• कृतिशील आयव्यय ही संकल्पना ..........

खर्चाची बाजू म्हणजे सुरुवातीचा मुद्‌द्दा असे गृहीत धरते.

उत्पादन म्हणजे सुरुवातीचा मुद्‌दा असे गृहीत धरते.

यापैकी दोन्हीही.

यापैकी दोन्हीही नाही.

• खालीलपैकी कोणते विधान बरोबर आहे ते स्पष्ट करा.

विकसित देशात राजकोषीय धोरणाचा आर्थिक स्थैर्यासाठी परिणामकारक उपाययोजना म्हणून वापर करता येईल.

विकसित देशात राजकोषीय धोरण कोणत्याही उद्‌दिष्टासाठी उपयुक्त नाही.

विकसित देशात फक्त मौद्रिक धोरण उपयुक्त ठरते.

यापैकी नाही.

• विकसनशील देशांच्या दृष्टीने सार्वजनिक आयव्यय महत्त्वाचे का मानले जातात?

कार्यक्षम वितरणासाठी

आर्थिक वाढीसाठी

पर्याप्त उत्पन्न विभाजनासाठी

यापैकी सर्व

• शासनाचे कार्य विचारात घेता सार्वजनिक आयव्यय महत्त्वाचे ठरतात, कारण ..........

शासनाकडून खासगी वस्तू-सेवांचा पुरवठा केला जातो.

शासनाकडून सार्वजनिक वस्तू-सेवांचा पुरवठा केला जातो.

शासनाकडून खासगी आणि सार्वजनिक अशा सर्वच वस्तू-सेवांचा पुरवठा केला जातो.

यापैकी नाही

• सार्वजनिक वस्तू आणि सेवा म्हणजे ..........

सामाजिक वस्तू आणि सेवा

खासगी वस्तू आणि सेवा

खासगी आणि सामाजिक या दोन्ही प्रकारच्या वस्तू आणि सेवा

यापैकी नाही

• सामाजिक वस्तु म्हणजे अशा वस्तू की, ..........

ज्या वस्तूंचा उपभोग सामुदायिकरीत्या केला जातो.

ज्या वस्तूंचा उपभोग वैयक्तिकरीत्या केला जातो.

ज्यांचा उपभोग घेतला जाऊ शकत नाही.

ज्यांचा फक्त शासकीय कर्मचाऱ्यांकडूनच उपभोग घेतला जातो.

• सार्वजनिक वस्तूंच्या बाबतीत .....

बाजारयंत्रणा गरजांचे समाधान करण्याचे कार्य करते.

बाजारयंत्रणा गरजांचे समाधान करण्याचे कार्य करू शकत नाही.

शासनाला पुरवठा करण्यासाठी अंदाजपत्रकात तरतूद करावी लागते.

यापैकी नाही

• सार्वजनिक वस्तू आणि सेवा ....

खासगी गरजांशी संबंधित असतात.

सामुदायिक गरजांशी संबंधित असतात.

सार्वजनिक गरजांशी संबंधित असतात.

सामुदायिक आणि सार्वजनिक गरजांशी संबंधित असतात.

• सामाजिक कल्याणाची संबंध ....

सामाजिक वस्तू आणि सेवांशी संबंध येतो.

खासगी वस्तू आणि सेवांशी संबंध येतो.

खासगी आणि सामाजिक वस्तूशी संबंध येतो.

खासगी आणि सामाजिक सेवांशी संबंध येतो.

• सार्वजनिक किंवा सामुदायिक वस्तू आणि सेवांच्या पुरवठ्याच्या बाबतीत ..........

बाजारयंत्रणा अयशस्वी ठरते.

शासनाची भूमिका महत्त्वाची असते.

खासगी क्षेत्राचा पुढाकार महत्त्वाचा असतो.

बाजारयंत्रणा अयशस्वी ठरते आणि शासनाची भूमिका महत्त्वाची असते.

• सामाजिक वस्तू आणि सेवांच्या बाबतीत ..........

सीमांत खर्च शून्य किंवा जवळजवळ शून्य असतो.

सीमांत खर्च बराच जास्त असतो.

सीमांत खर्च नकारात्मक असतो.

सीमांत खर्च महत्त्वाचा असतो.

• सामाजिक वस्तूंच्या बाबतीत ..........

सीमांत उपयोगिता निश्चित करता येत नाही.

सीमांत उपयोगिता निश्चित करता येते.

नगांचा उपभोग एकामागून एक असा घेतला जातो.

सीमांत उपयोगिता फार जास्त असते.

• खासगी वस्तूच्या संदर्भात खालीलपैकी कोणती संकल्पना संबंधित आहे ?

बाजारयंत्रणा

सार्वजनिक गरजांची पूर्तता

उपभोक्त्याचे सार्वभौमत्व

बाजारयंत्रणा आणि उपभोक्त्याचे सार्वभौमत्व

• खालीलपैकी कोणत्या कारणांमुळे उत्पन्नाचे योग्य विभाजन शक्य आहे ?

कराद्वारे वरच्या वर्गातील लोकांचे उत्पन्न घटविल्यास

सार्वजनिक खर्चाद्वारे खालच्या वर्गासाठी अनेक सुविधा निर्माण केल्यास

कराद्वारे वरच्या वर्गातील लोकांचे उत्पन्न घटविल्यास आणि सार्वजनिक खर्चाद्वारे खालच्या वर्गासाठी अनेक सुविधा निर्माण केल्यास

यापैकी नाही

• "कर म्हणजे सार्वजनिक सत्तेला सक्तीने द्यावी लागणारी रक्कम असून ज्यामुळे करदात्याला तेवढ्याच प्रमाणात सेवा प्राप्त होत नाही आणि कराची रक्कम करदात्याला कोणत्याही प्रकारच्या अपराधाबद्दल दंड म्हणून घेतली जात नाही."

प्रा. डाल्टन

प्रा. टेलर

प्रा. सेलिगमन

प्रा. बॅस्टेबल

• " कर म्हणजे कोणत्याही प्रत्यक्ष फलाची अपेक्षा न बाळगता करदात्याने सार्वजनिक खर्चासाठी जी सक्तीची रक्कम दिलेली असते."

प्रा. सेलिगमन

प्रा. बॅस्टेबल

प्रा. टेलर

प्रा. डाल्टन

• "कर म्हणजे सार्वजनिक खर्च भागविण्यासाठी जेव्हा सरकार लोकांकडून कोणताही प्रत्यक्ष मोबदला न देता, शक्तीने कराची वसुली करते."

प्रा. सेलिगमन

प्रा. टेलर

प्रा. डाल्टन

प्रा. बॅस्टेबल

• "कर म्हणजे सार्वजनिक हिताच्या कार्यासाठी व्यक्ति किंवा व्यक्ति समुहाकडून होणारे संपत्तीचे सक्तीयुक्त अंशदान होय."

प्रा. सेलिगमन

प्रा. टेलर

प्रा. डाल्टन

प्रा. बॅस्टेबल

• करांचे लक्षण ..........

कर हे सक्तीचे साधन होय.

कर हा व्यक्ती व कंपन्यावर आकारण्यात येतो.

कर लावण्याचा अधिकार फक्त शासनाचा असतो

यापैकी सर्व

• प्रत्यक्ष कर ..........

प्राप्तीकर

महामंडळ कर

संपत्तीकर

यापैकी सर्व

• "जेव्हा शासनाचा उद्देश ज्या व्यक्तीवर कर आकारला त्याच व्यक्तीने तो भरावा असा असतो. तेव्हा त्याला प्रत्यक्ष कर Direct Tax असे म्हणतात."

डॉ. डाल्टन

प्रा. जे. एस. मिल

प्रा. फिंडले शिरास

प्रा. प्रेस्ट

• "प्रत्यक्ष कर म्हणजे असा कर होय की जो ज्या व्यक्तीवर कायद्यानुसार आकारण्यात येतो आणि त्या व्यक्तिकडूनच तो भरला जातो."

डॉ. डाल्टन

प्रा. जे. एस. मिल

प्रा. फिंडले शिरास

प्रा. प्रेस्ट

• "प्रत्यक्ष कर म्हणजे व्यक्तीच्या मालमत्तेवर व उत्पन्नावर, आकारण्यात येतो आणि व्यक्तीकडूनच तो भरला जातो."

डॉ. डाल्टन

प्रा. जे. एस. मिल

प्रा. फिंडले शिरास

प्रा. प्रेस्ट

• "………. म्हणजे ज्या कराचा आघात (Impact of Tax) आणि कराचा आपात (Incidence of Tax) एकाच व्यक्तीवर पडतो, त्याला प्रत्यक्ष कर संबोधले जाते."

प्रत्यक्ष कर

अप्रत्यक्ष कर

पुरोगामी कर

प्रतिगामी कर

• "प्रत्यक्ष कर म्हणजे जो कर व्यव्तीच्या उत्पन्नावर आकारला जातो."

प्रा. प्रेस्ट

डॉ. डाल्टन

प्रा. जे. एस. मिल

प्रा. फिंडले शिरास

• ………. कराचे संक्रमण होत नाही .

प्रत्यक्ष कर

अप्रत्यक्ष कर

पुरोगामी कर

प्रतिगामी कर

• प्रत्यक्ष कर हे उत्पन्न वाढीबरोबर ………. जातात.

वाढत

घटत

स्थिर होत

शुन्य होत

• "जेव्हा व्यक्तीवर आकारलेला कर ती दुस-अयावर ढकलू शकते आणि शासनाचा उद्देश त्या व्यक्तिनेच कर भरावा असा नसेल तर तो अप्रत्यक्ष कर होय."

प्रा. जे एस मिल

डॉ. डाल्टन

प्रा. शिरास

प्रा. बुलक

• "उपभोग्य वस्तूंवर लावलेल्या करांना अप्रत्यक्ष कर म्हणताल."

प्रा. जे एस मिल

डॉ. डाल्टन

प्रा. शिरास

प्रा. बुलक

• "अप्रत्यक्ष कर म्हणजे ज्या व्यक्तिबर तो आकारला आहे त्या व्यक्तीकडून तो भरल्या जात नसुन तो दुसऱ्या व्यक्तिकडून भरल्या जातो."

प्रा. जे एस मिल

डॉ. डाल्टन

प्रा. शिरास

प्रा. बुलक

• "ज्या कराचा आघात (Impact of Tax) एका व्यक्तीवर आणि आपात (Incidence of Tax) दुसऱ्या व्यक्तीवर पडतो त्याला .......... संबोधले जाते."

अप्रत्यक्ष कर

प्रत्यक्ष कर

प्रतिगामी कर

पुरोगामी कर

• "अप्रत्यक्ष कर म्हणजे ज्या करांचा भरणा उपभोक्तांकडून शासनाकडे प्रत्यक्षपणे होत नाही असे सर्व कर होय."

प्रा. जे एस मिल

डॉ. डाल्टन

प्रा. शिरास

प्रा. बुलक

• अप्रत्यक्ष कराचे उदाहरण ........

विक्रीकर

उत्पादन कर

करमणुक कर

यापैकी सर्व

• "जेव्हा उत्पन्न वाढीबरोबर कराचे दर देखील वाढविले जातात, तेव्हा त्याला .......... असे म्हणतात.

पुरोगामी कर

अप्रत्यक्ष कर

प्रत्यक्ष कर

प्रतिगामी कर

• "व्यक्तीच्या उत्पन्नवादीबरोबर कराचे दर कमी होत असतील तर अशा करांना .......... असे म्हणतात.

पुरोगामी कर

अप्रत्यक्ष कर

प्रत्यक्ष कर

प्रतिगामी कर

• 'उपलब्ध कापडानुसार कोट तयार केला जातो.' हे विधान कोणत्या व्यवहाराबद्दल मांडले गेलेले आहे?

सार्वजनिक आयव्यय

वैयक्तिक आयव्यय

खासगी आयव्यय

यापैकी नाही

• सार्वजनिक आयव्ययात ....

शासकीय अधिसत्तेच्या वित्तीय बाबींचा अभ्यास केला जातो.

खासगी संस्थांच्या वित्तीय बाबींचा अभ्यास केला जातो.

सहकारी संस्थांच्या वित्तीय बाबींचा अभ्यास केला जातो.

यापैकी नाही.

• अँडम स्मिथच्या मते शासनाची मुख्य कर्तव्ये कोणती ?

बाह्य आक्रमणापासून अर्थव्यवस्थेचे संरक्षण करणे.

अंतर्गत कायदा-सुव्यवस्था राखणे

सार्वजनिक वस्तूंचा पुरवठा करणे.

वरील सर्व

• खालीलपैकी कोणते कार्य शासनाकडून पार पाडले जाऊ शकते?

साधनसामग्रीचे योग्य वितरण

खासगी वस्तूंचे योग्य वितरण

साधनसामग्रीची परिणामकारक गतिमानता

साधनसामग्रीचे योग्य वितरण आणि साधनसामग्रीची परिणामकारक गतिमानता

• .......... च्या तत्वाप्रमाणे उर्मूला हिक्स यांनी देशाच्या संरक्षणावरील खर्च, नागरी खर्च , आर्थिक व्यवहार व व्यवस्थापन खर्च, सामाजिक कल्याणवरील खर्च असे

सार्वजनिक खर्चाचे वर्गीकरण केलेले आहे.

ॲडम स्मिथ

प्रा. जे एस मिल

डॉ. डाल्टन

प्रा. शिरास

• .......... म्हणजे शासनाचा चालू खर्च होय. असा खर्च सतत करावा लागतो. यालाच विकासेतर खर्च असेही म्हणतात.

महसूली खर्च

भांडवली खर्च

ऐच्छिक खर्च

प्राथमिक खर्च

• रेल्वे, पोस्ट, टेलिग्राम, प्रशासकीय खर्च, देखभाल खर्च, अन्न खाते, कर्जमाफी इ. वरील अनुदान केंद्रशासनाकडून राज्य शासनाला देण्यात येणारी अनुदाने, पेन्शन, शेती उद्योग व सेवा क्षेत्रावरील खर्च, शिक्षण, आरोग्य व दळणवळणावरील खर्च इ. चा .......... समावेश होतो.

भांडवली खर्चात

महसूली खर्चात

ऐच्छिक खर्चात

प्राथमिक खर्चात

• .......... शासनाच्या सर्व भांडवली व्यवहारांचा समावेश होतो.

भांडवली खर्चात

महसूली खर्चात

ऐच्छिक खर्चात

प्राथमिक खर्चात

• मोठ्या व महत्त्वाचा उद्योगांची उभारणी, पोलाद, लोखंड, सिमेंट, अणूउर्जा, उद्योगांची स्थापना, राज्यशासनाला देलेली कर्ज इ. विविध खर्चाचा .......... समावेश होतो.

भांडवली खर्चात

महसूली खर्चात

ऐच्छिक खर्चात

प्राथमिक खर्चात

• शासनाला अनेक कार्य अनिवार्य असतात. तरीही अशी कार्य म्हणजे स्वेच्छेने केलेल्या कार्यासाठी शासनाला जो खर्च करावा लागतो त्याला ऐच्छिक खर्च असे म्हणतात.

ऐच्छिक खर्च

भांडवली खर्चात

महसूली खर्चात

प्राथमिक खर्चात

• ऐच्छिक खर्च ......

शिक्षण

आरोग्य

वाहतूक

यापैकी सर्व

• .......... यांनी हे सार्वजनिक खर्चाचे प्राथमिक खर्च व दुय्यम खर्च वर्गीकरण केलेले आहे.

प्रा. शिरास

प्रा. जे एस मिल

डॉ. डाल्टन

ॲडम स्मिथ

• शासनाला आपले अस्तित्व टिकविण्यासाठी जो खर्च करावा लागतो त्याला .......... असे म्हणतात. असा खर्च शासनाला करावाच लागतो.

प्राथमिक खर्च

ऐच्छिक खर्च

भांडवली खर्च

महसूली खर्च

• प्राथमिक खर्च ..........

संरक्षण खर्च

प्रशासनखर्च

न्यायदानावरील खर्च

यापैकी सर्व

• शासनाला दुय्यम किंवा गौण कार्य पुर्तीसाठी जो खर्च करावा लागतो त्याला असे म्हणतात.

प्राथमिक खर्च

ऐच्छिक खर्च

भांडवली खर्च

दुय्यम खर्च

• दुय्यम खर्च ..........

बेकारी भत्ता

उच्च शिक्षण

आरोग्य

यापैकी सर्व

• शासनाच्या विविध विकासाच्या कामासाठी जो खर्च करावा लागतो त्याला .......... असे म्हणतात.

विकास खर्च

प्राथमिक खर्च

ऐच्छिक खर्च

भांडवली खर्च

• विकास खर्च ..........

शेती विकास

पाणीपुरवठा

विज

यापैकी सर्व

• विकास कार्याशिवाय शासनाला जो इतर खर्च करावा लागतो त्याला .......... असे म्हणतात.

विकासेतर खर्च

प्राथमिक खर्च

ऐच्छिक खर्च

भांडवली खर्च

- विकासेतर खर्च ..........

निवृत्ती वेतन

प्रशासकीय सेवा

अंतर्गत सुरक्षितता

यापैकी सर्व